Impact Factor - 7.675 ISSN – 2278-9308

# B.Aadhar

## Peer-Reviewed Indexed

### *Multidisciplinary International Research Journal*

**JUNE - 2020**

**ISSUE No – CCXXXV ( 235)**

**Prof. Virag.S.Gawande**
**Chief Editor :**
**Director**
Aadhar Social Research &, Development Training Institute, Amravati.

**Dr. R.S.Satbhai**
**Executive Editor**
**Local Secretary**
Adv.B.D.Hambarde Mahavidyalaya Ashti

**Guest Editor**

| Dr. S.R.Nimbore | Dr. Satish Kadam | Dr. Shivraj Bokade |
| --- | --- | --- |
| Principal | President,AMIP& | Secretary,AMIP& |
| Adv.B.D.Hambarde Mahavidyalaya Ashti | Head,Dept of History YCM,Tuljapur | Head,Dept of History YC,Nanded |

## Aadhar International Publication

© All rights reserved with the authors & publisher



237

Scanned by CamScanner

| | | |
|---|---|---|
| 84 | महात्मा बसवेश्वर यांचे सामाजिक विचार एक चिंतन ... डॉ. बाबासाहेब केशवराव शेप, | 378 |
| 85 | भारतातील बेकारी व मेक इन इंडिया प्रा.डॉ.कार्तिक पोळ | 383 |
| 86 | कर्मवीर भाऊराव पाटील यांचे तत्वनिष्ठ शिक्षणकार्य डॉ.एस.जी.बेंजलवार | 387 |
| 87 | भारतीय स्वातंत्र्य लढयातील महात्मा गांधीजींचे योगदान **प्रा. राजश्री गुणाजीराव भोपाळे** | 392 |
| 88 | भारतीय उच्च शिक्षणासमोरील आव्हाने प्रा. रमेश एकनाथ भारूडकर | 397 |
| 89 | लालबागचा राजा सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ : एक न संपणारा प्रवास भिकाणे शोभा राजेंद्र | 400 |
| 90 | कोविड–१९ भारतीय शेतीक्षेत्राची दशा आणि दिशा प्रा. डॉ. वर्षा कमलाकर नेहेते | 405 |
| 91 | निजाम राजवटीविरुद्ध औरंगाबाद जिल्ह्यातील उठाव (१८२२-१८५७) प्रा.डॉ.दामाजीवले एम.डी | 411 |
| 92 | वरोरा, भद्रावती, तालुक्यातील ऐतिहासीक स्थळे व विकासाच्या दिशा प्रा. डॉ. दीपक पां. लोणकर | 417 |
| 93 | वैयक्तिक सत्याग्रह व छोडो भारत चळवळीत यावल तालुक्यातील न्हावी गावाचे योगदान **प्रा.डॉ.दिनेश रामदास महाजन,** | 423 |
| 94 | मानवाधिकार और भारतीय महिलाओं का सामाजिक जीवन प्रा. डॉ. वैशाली एस. भाकरे | 427 |
| 95 | छत्रपती शिवाजी महाराजांचा महिलाविषय दृष्टिकोन प्रा.डॉ.बोचरे जे.एम. | 432 |
| 96 | महात्मा गांधी आणि अस्पृश्यता निर्मुलन डॉ. शिवराज चंद्रकांत बोकडे | 435 |
| 97 | बदलती शिक्षण पध्दती – एक अवलोकन प्रा. डॉ. ज्वाला श. नागले | 442 |
| 98 | भारत– चीन सीमावाद व पंडित जवाहरलाल नेहरू प्रा. डॉ कदम सतीश रावसाहेब | 446 |
| 99 | राजुरा मुक्तिसंग्राम : एक चिकित्सक परिक्षण डॉ. कैलाश एम. फुलमाळी | 449 |
| 100 | जैन तत्वज्ञान आणि शिक्षण पद्धतीचे समकालीन महत्त्व प्रा. डॉ. कविता तातेड | 452 |
| 101 | छत्रपती शाहू महाराजांचे विचार आणि डॉ. पंजाबराव देशमुख यांचे कार्य डॉ. प्रशांत प्र. कोठे | 458 |
| 102 | स्वातंत्र्योत्तर काळातील मराठी कादंबरीची वाटचाल प्रा. डॉ. पांडूरंग एकनाथ शिवशरण | 464 |
| 103 | स्त्री शिक्षणामधील क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले यांचे कार्य आणि योगदान : एक ऐतिहासिक अभ्यास प्रा. डॉ. वंदना राजेश शिंदे | 470 |




Scanned by CamScanner

B.Aadhar' International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor - ((SJIF) -7.675,
Issue No,235
ISSN : 2278-9308
June 2020

# कर्मवीर भाऊराव पाटील यांचे तत्वनिष्ठ शिक्षणकार्य

डॉ.एस.जी.बेंजलवार
महाराष्ट्र महाविद्यालय, निलंगा

महाराष्ट्रातील समाजसुधारणेच्या इतिहासात कर्मवीर भाऊराव पाटील यांचे शिक्षणकार्य महत्वाचे व महाराष्ट्राला खऱ्या अर्थाने आधुनिक बनवणारे आहे. कर्मवीर भाऊराव पाटील यांचे कार्य हे व्यापक स्वरूपाचे आहे. शिक्षणविषयक कार्याला एक तात्विक अधिष्ठाण प्राप्त झालेले होते. आपल्या विचार व कार्यातून समग्र व्यवस्था परिवर्तनाचा त्यांनी प्रयत्न केला. त्यांनी हे केलेले कार्य पाहून लोकांनी त्यांना कर्मवीर ही उपाधी दिली. ते अण्णा या टोपन नावानेही सर्व परिचित होते. अगदी बालपणापासूनच्या जडणघडणीमध्येच तत्वनिष्ठा हे त्यांचे स्वभाव व व्यक्तीमत्वाचे वैशिष्टये बनले होते. एकदा एखादे तत्व वा विचार स्विकारले की त्यासाठी वाटले ती करण्याची त्यांची तयारी असे. त्यांच्या शिक्षणकार्यातील हीच तत्वनिष्टा प्रस्तूत लेखात मांडण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. समाजसुधारणा चळवळीचा इतिहास पाहता असे लक्षात येते की,समाजातील सर्व समिस्यांचे कारण अज्ञान आहे. हे प्रथमत: महात्मा फुलेंनी ओळखले होते. आणि त्यासाठी म्हणून समाज सुधारणेची पुर्वअट अज्ञान दुर करणे ही आहे असे समजून महात्मा फुलेंनी बहूजन समाजात विशेषत:स्त्री—शुद्रातिशुद्रांना शिक्षण देण्याचे काम केले. त्याचप्रमाणे राजसत्तेचा उपयोग राजर्षी शाहू महाराजांनी शिक्षणाच्या प्राचार प्रसारासाठी केला. या दोन महान समाजसुधारकांचा आदर्श डोळयासमोर ठेउन त्यांच्या विचार व कार्यातून प्रेरणा घेउन कर्मवीरं भाऊराव पाठील यांनी महाराष्ट्रातील विशेषत: तळागाळातील खेडयापाडयातील बहूजन समाजाला शिक्षण देउन त्यांच्या जीवनमानात परिवर्तन घडवून आणण्याचे काम केले.

भाऊराव पाटील यांच्या शैक्षणिक जडणघडणीत त्यांना फारसी गती नव्हती. त्यामूळे त्यांना सहाव्या इयत्तेच्या पुढचे शिक्षण घेता आले नव्हते. परंतू त्यांनीच नंतरच्या काळात तत्वनिष्ठेने स्विकारलेल्या शिक्षणविषयक कार्यातून एक आदर्श निर्माण केला. सुरूवातीच्या काळात आपला संसार व नोकरी साभाळून हे कार्य चालू केले. परतू ज्यावेळी त्यांना हे प्रयत्न अपूरे वाटले त्याचवेळी त्यांनी नोकरीचा राजीनामा देवून अज्ञानी जनांच्या उध्दारासाठी आपले तीवन झोकून दिले. 'स्वाभिमानी व स्वावलंबी मार्गाने शिक्षण घेणारा विद्यार्थीच देशाला समृध्द व समर्थ बनविल अशी त्यांची ठाम धारणा होती.'(अप्पासाहेब पाटील १९८७ प्रस्तावना)आणि त्या दृष्टीनेच अगदी सुरूवातीपासून वसतीगृहातील विद्यार्थ्यामध्ये स्वावलंबन व स्वाभिमानाचे बीज रूजवण्यास त्यांनी सुरूवात केली होती. स्वावलंबन,स्वाभिमान,स्वाध्याय व श्रमप्रतिष्ठा या चर्तुसुत्रीवर भाऊराव पाटील यांच्या शैक्षणिक तत्वज्ञानाचे उभारणी झालली होती. 'स्वावलंबी शिक्षण हेच आमचे ब्रिद'या कर्मवीरांच्या रयत शिक्षण संस्थेच्या ब्रिद वाक्यातच त्यांच्या तत्वज्ञानाचे सार सामावले आहे. कर्मवीरांच्या शैक्षणिक तत्वज्ञानाबद्दल बॅ.पी.जी.पाटील म्हणतात.'वसतीगृह जीवनाववर भर, जातीय ऐक्य,स्वावलंबन,स्वाभिमांन,श्रमप्रतिष्ठा व श्रमपावित्र्य,भूमातेशी प्रत्यक्ष संबंध,मानवतावाद,विश्वबंधुत्व,स्वातंत्र्यचिंतन व स्वातंत्र्यासाठी प्रयत्न,आदर्श ग्रामसेवक,व त्यागी व सेवामय असे तप:पूत जीवनध्येय,साधेपणा,जनतेशी एकरूपता,प्रसिध्दिपासून मुद्याम चार पावले दुर राहून अज्ञानांधकारात पिचत पडलेल्या रयतेला नंदादिपाप्रमाणे सतत तेवत राहून मार्ग उजळून टाकण्याची शिकवण,शिक्षण हे माणसाच्या विकासाचे मूळ आहे व शिक्षणानेच माणूस बहूश्रूत व विवेकी बनतो अशी त्यांची विचारसरणी होती.'(भिडे,पाटील,डिसे.२०१४)अशा विस्तृत' स्वरूपात बॅ.



240

Scanned by CamScanner

पी.जी. पाटील कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या विचारसरणीची वं शिक्षणकार्य तत्वज्ञानाची मांडणी केली आहे. त्यावरून त्यांचे शिक्षणविषयक कार्य व तत्वज्ञान किती व्यापक होते हे लक्षात येते.

कर्मवीर भाऊरावांनी शिक्षणकार्याला सुरूवात करण्यापूर्वी महाराष्ट्रात अनेक शिक्षण संस्था स्थापन झाल्या होत्या. ब्रिटिश सरकारच्या पुढाकारातून शिक्षण प्रचार आणि प्रसाराला गतिही प्राप्त झाली होती. परंतू हे सर्व प्रयत्न शहरांमध्येच चालू होते. हाताच्या बोटावर मोजता येतील अशा संस्था केवल प्रस्थापितांच्या कुंपनामध्येच शिक्षणाचे काम करीत होत्या. ग्रामिण भागात शिक्षण ही कल्पनाही पोहाचली नव्हती. अठराविश्व दरिद्रय असलेला बहूजन समाज,'रयत'सागरासारखा अथांग पसरलेला आहे. तो अज्ञान अंधकारात खितपत पडलेला आहे. अत्यंत काबाडकष्ठ करूनही त्याला पोटभर अन्न व अंगभर कपडा मिळत नाही. त्यांच्या सर्व दु:खाचे मुळ अज्ञानात आहे,अविद्येत आहे. त्याला शिक्षण दिले पाहिजे असे कर्मवीर भाऊरावांना वाटत असे. म्हणून या तत्वाशी एकनिष्टता बाळगूनच त्यांनी स्थापन केलेल्या शिक्षण संस्थेचे नाव 'रयत शिक्षण संस्था'असे ठेवले.

रयेत शिक्षण संस्थेच्या स्थापनेचा इतिहास पाहिला तर भाऊरावांनी हे नाव आपल्या शिक्षण कार्याच्या तत्वनिष्ठेतून सुचवलेले दिसते. सत्यशोधक कार्यकर्त्याच्या वाले येथे भरलेल्या बैठकीत भाऊरावांनी ग्रामिण भागात शिक्षण प्रसार करण्यासाठी शिक्षण संस्था स्थापन करण्याचा ठराव मांडला त्याला सर्वांनी अनुमती दिली.संस्थेच्या नावाबद्दल भाऊराव म्हणाले की,'खेडयापाडयात पसरलेला बहूजन समाज हा शेतकरी समाज.शेतकरी हा विश्वाचा पालन कर्ता. शेतकऱ्यांच्या बहूजन समाजाच्या मुलांना शिक्षण देण्याकरीता शिक्षण संस्था काडली पाहीजे. शेतकरी म्हणजे रयत रयतेला शिक्षण देण्याकरीता संस्था काढली पाहीजे म्हणून संस्थेला रयत शिक्षण संस्था असे नाव दयावे.' (पवार बा.ग.१९८९)बैठकीत सर्वानुमते हे नाव ठरले व रयत शिक्षण संस्था इ.स. १९१९ मध्ये स्थापन झाली. कर्मवीर भाऊरावांच्या संस्थेला रयत हे नावामध्येही खेडयापाडयातील बहूजन समाजाला शिक्षण मिळाले पाहीजे ही तत्वनिष्ठा होती. याच तत्वाला अनुसरून त्यांनी खेडोपाडी हिंडून शेतक—यांची मुले वसतिगृहात शिक्षणासाठी आणली. संस्थेच्या, उद्देशांमध्येही खेडयापाडयातील मागासलेल्या वर्गात शिक्षणाची अभिरूची निर्माण करणे, शिक्षणाचा प्रचार—प्रसार करणे यासारखे उद्देश केद्रवर्ती ठेवण्यात आले.

सातारायेथून संस्थेच्या कार्याची सुरूवात भाऊराव पाटील यांनी केली. पुढे राजघराण्याकडून त्यांना या कामी धनिणिची बाग मिळाली. या बागेत एक विशाल असे वडाचे झाड होते. प्रारंभीच्या काळात वसतिगृहातील विद्यार्थ्यांचे बहुतांश उपक्रमि याच झाडाखाली होत असत. भाऊरावांनी हे वडाचे झाड आपल्या संस्थेचे बोधचिंन्ह म्हणून निवडले. त्यापाठीमागील त्यांची भूमिका स्पष्ट होती. ते या संदर्भात म्हणत,'माझी संस्था ही या वटवृक्षासारखी आहे.'(पवार बा.ग.पृ.१२४) वडाच्या झाडाचे एक वैशिष्टय असते,त्याची फांदी कुठेही लावली की त्याचे वृक्षात रूपांतर होते अगदी त्याचप्रमाणे भाऊरावांनी रयतची शाखा कोठेही काढली की ती वाढत होती.अशीच उत्तरोत्तर ही संस्था वटवृक्षाप्रमाणे वाढावी हा उद्देश यापाठीमागे होता.संस्थेचा प्रचार आणि प्रसार हे तत्व स्विकारून त्यांनी हे बोध चिन्ह निवडले होते. त्याचबरोबर वडाचे झाड हे बोधचिन्ह म्हणून निवडण्यामागे भाऊरावांची आणखी एक भूमिका होती. वडाचे झाड हे दिर्घायूषी असते. त्या झाडाला दिर्घायुषी बनवण्यात झाडाच्या फांदयाला आलेल्या पारंब्या स्वता:ला जमिनित गाढून घेवून मूळ वृक्षाला आधार देत असतात. अगदी त्याप्रमाणे रयत शिक्षण संस्थेच्या वसतिगृहात व शाळेत शिकलेल्या विद्यार्थ्यांनी भविष्यात ही संस्था वाढवण्यासाठी काम करावे. आपल्या संस्थेत शिकणा—या विद्यार्थ्यामधूनच भाऊरावांनी संस्थेसाठी ध्येयवादी तत्वनिष्ठ 'आजीव सेवक'तयार केले. इ.स.१९३७ महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांच्या उपस्थितीत संस्थेत शिक्षण घेतलेल्या १२ विद्यार्थ्यांनी भाऊराव पाटील यांची तत्वनिष्ठा स्विकारून संस्थेसाठी काम करण्याची आजीव सेवकत्वाची शपथ



(241)

Scanned by CamScanner

B.Aadhar' International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor - ( (SJIF) -7.675,
Issue No,235
ISSN : 2278-9308
June 2020

घेतली. अशाच प्रकारसचा एक समारंभ भाऊराव पाटील यांच्या निधनानंतर १९६० मध्ये पार पडला.त्या समारंभात २५ विद्यार्थ्यांनी संस्थेचे आजीव सेवक म्हणून शपथ घेतली. भाऊराव पाटील तत्वनिष्ठेने सुरू केलेल्या शिक्षण कार्यामुळेच त्यांची संस्था त्यांच्या नंतरही याच आजीव सेवकांनी चालवली संस्थेचे आजीव सेवकत्व सदस्यत्व संस्थेत वाढलेल्या विद्यार्थ्यांनीच स्विकारावी ही त्यांची भूमिका होती. त्यामूळे कुणी कितीही पैसे देवून संस्थेचा सभासद होण्याची इच्छा व्यक्त केल्यास भाऊराव ती देणगी नाकारत असत. कारण त्यांनी ही संस्था पैशासाठी नव्हे तर तत्वनिष्ठपणे चालवली होती. म्हणून संस्थेत भाऊरावांच्या विचाराने वाढलेल्या विद्यार्थ्यांनीच पुढे तत्वनिष्ठा स्विकारून स्वतःला संस्थेसाठी समर्पित केले.या तत्वनिष्ठेमुळेच संस्थेच्या रोपटयाचे मोठया वटवृक्षात रूपांतर झाले.

कर्मवीर भाऊराव पाटील तत्वनिष्ठेतून सुरू केलेल्या वसतिगृहात गावोगावी हिंडून मुले जमा करीत असत.त्या मुलांच्या जेवणाखाण्याची,कपडेलत्याची शिक्षणाची सोय त्यांच्या घरच्यांकडून झाली ठीक नाही तर भाऊराव पाटील संस्थेच्या वतिने ती सोय करीत असत. अर्थात हे सर्व करण्यासाठी भाऊराव कोणी लखोपती नव्हते. त्याचबरोबर त्यांना संस्था तर चालवायची होती. सुरूवातीच्या काळात त्यांनी मुष्ठी योजना,सोळा योजना,चालवून विद्यार्थ्याच्या खाण्यापिण्याची गरज भागवली देणग्यामधून पैसा उभा केला,परंतू याहीपेक्षा महत्वाचे म्हणजे या सर्व प्रक्रियेत त्यांनी विद्यार्थ्यांना स्वावलंबी बनवण्याचा प्रयोग सुरू केला तो अत्यंत महत्वाचा होता. संस्थेत शिकणारे विद्यार्थी हे खेडयापाडयातले खेडयामध्ये आधीच आठराविश्व दारिद्रय,त्यामूळे शिक्षणावर खर्च करण्याची ऐपत नसे. या सर्व परिस्थितीवर मात करण्यासाठी भाऊरावांनी विद्यार्थ्यांना स्वावलंबनाचे तत्व दिले. धनिनीच्या बागेत विद्यार्थी श्रम करू लागले त्यातूनच संस्थेचे 'स्वावलंबी शिक्षण' हे ब्रिद साकारले स्वावलंबी शिक्षणाच्या प्रयोगातूनच भाऊरावांनी कमवा आणि शिका ही योजना नावारूपास दआली. 'कमवा आणि शिका श्रम करा आणि शिका' हा मंत्र भाऊरावांनी विद्यार्थ्यांना दिला. श्रमाच्या प्रतिष्ठेची दिक्षाच दिली आणि विद्यार्थ्यांचे हात कामाला लागले. (पवार,पृ. १३०)सातारा येथील धनिणीच्या बागेतील जमिनिवर विद्यार्थी मेहणत करू लागले. पडीक जमिनिचे विद्यार्थ्यांनी श्रमाच्या बळावर नंदनवन केले. परिणामी यातून विद्यार्थ्याच्या खाण्यापिण्याची व शिक्षणाची व्यवस्था झाली.

भाऊरावांनी पुणे येथे सुरू केलेल्या युनियन बोर्डिगमध्ये स्वावलंबणाच्या तत्वावर शिक्षण घेतलेले व पुढे प्रख्यात साहित्यिक बनलेले शंकरराव खरात यांनी 'तराळ–अंतराळ'या पुस्तकात एक अनुभव कथन केला आहे.युनियन बोर्डिंगमध्ये एकदा भाऊराव पाटील आले होते. त्या दिवशी स्वंयपाक करण्याची पाळी शंकरराव खरात यांची होती. ते स्वयंपाकाच्या खोलित भाकरी करत असताना अचानक अण्णा मध्ये आले. पाहतात तर काय धुराने डोळयात सारखे पाणी येत होते. हे पाहून ते म्हणाले,"काय रे हा धूर!" सरपण आले आहे आण्णा डोळे नाक पुसत मी म्हणालो. त्यावर अण्णा म्हणाले अशी तपश्चर्या केल्याशिवाय प्रकाश दिसनार नाही.! आण्णांचा हा संदेश मी हृदयावर कोरून ठेवला. तपश्चर्या करा,प्रकाश दिसेल (पवार बा.ग.पृ.१३६)हा भाऊरावांनी विद्यार्थ्यांना दिलेला सेदेश ख–या अर्थाने स्वावलंबन व श्रममुल्याच्या माध्यमातूनच अंधारातून प्रकाशाकडे नेणारा होता. हा प्रकाश त्यांना अंधारात खितपत पडलेल्या ग्रामिण भागात शिक्षणाच्या माध्यमातून निर्माण करावयाचा होता.

स्वावलंबनाच्या प्रयोगासोबतच भाऊरावांनी आपल्या संस्थेत धर्म,पंथ,जातीपाती विरहीत एकात्मतेच्या तत्वाचीही शिकवण आपल्या विद्यार्थ्यांना दिली.भाऊराव पाटील यांच्या वसहिगृहात आंठरापगड जातीची मुले एकत्र राहत असत. सहभोजन स्वतःच्या श्रमाने स्वावलंबन स्विकारून राहत होती, शिक्षण घेत होती. थोडक्यात भाऊराव पाटील यांनी शिक्षण कार्यातून जातिपातीविरहीत



Scanned by CamScanner

राष्ट्रीय एकात्मतेचा एक प्रयोगच आपल्या संस्थेत सुरू केला होता. एकदा महात्मा गांधीजी सातारा येथे आले असता भाऊरावांनी त्यांना आग्रहपुर्वक धनिणीच्या बागृत नेऊन त्यांच्या हस्ते राजर्षी शाहू बोर्डिंगचे उदघाटन करून घेतले. वसतिगृहातिल स्वावलंबी व एकात्मतेचे सहजिवन पाहून महात्मा गांधीजी म्हणाले 'भाऊराव साबरमती आश्रमात जे मला करता आले नाही ते आपण येथे यशस्वी करून दाखविले आहे. स्वातंत्र्य लढयाच्या वेळीव भारत' देश स्वतंत्र झाल्यानंतर सर्वजातीधर्माच्या लोकांना एकत्र अनण्याचे जे माझे स्वप्न आहे ते तूम्ही प्रत्यक्षात आणले आहे. ख—या अर्थाने तूमचे हे राष्ट्रीय कार्य आहे. आपल्या कार्यास माझा आशिर्वाद व शुभेच्छा' (पवार बा.ग.पृ.१८१)अशा श्ब्दामध्ये गांधीजींनी कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या कार्याचे कौतूक केले. भाऊराव पाटील यांनी आपल्या वसतिगृह व संस्थेत शिक्षण घेणा—या विद्यार्थ्यांमध्ये एकात्मतेची भांवना व त्यातूनच राष्ट्रीय एकात्मतेचे तत्वज्ञान पेरण्याचे काम करत होते.

कर्मविरांनी वसतिगृहापासून सुरू केलेल्या संस्थेचे रोपटे हळूहळू वाढवले खेडयापाडयामध्ये त्यांनी शाळा काढल्या. गावोगावी जावून ते गावक—यांना म्हणत तूम्ही मला मोफत जागा व साधने दया तूमच्या मुलांना श्रमाच्या बदल्यात मी शिक्षण देईन. आणि त्यातून अनेक शाळा त्यांनी काढल्या परंतू उच्च शिक्षणासाठी खेडयापाडयातील मुलांना मुंबई,पुणे,कोल्हापूर यांसारख्या ठिकाणी जाणे अशक्य होई म्हणून भाऊराव पाटील यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या नावे एक कॉलेज काढण्याचा निर्धार केला. परंतू त्यासाठी पैशाची आवश्यकता होती. ही त्यांची गरज पाहून एका धनिकाने त्यांना पत्राद्वारे कळवले की छत्रपती शिवाजी या नावाऐवजी आम्ही सुचवू ते नाव कॉलेजला दिल्यास तूम्हाला लागेल तेवढा पैसा दयायला आम्ही तयार आहोत. हे पत्र वाचून त्यांना पाठवलेले उत्तर हे त्यांच्या शिक्षणकार्याबद्दलची तत्वनिष्ठा दर्शवणारे आहे. भाऊरावांनी उत्तर पाठवले की,'आम्हाला आपली देणगी नको. एक वेळ मी माझ्या बापाचे नाव बदलेन,पण छत्रपती शिवाजी हे कॉलेजला दिलेले नाव मी बदलणार नाही. तत्व विकूण पैसा घेतला तर हा भाऊ पाटील मेला' (पवार बा.ग.पृ.१८१) तत्व जोपासण्यासाठी भाऊरावांनी घेतलेली ही भूमिका म्हणजे त्यांचे शिक्षण कार्यातील तत्वनिष्ठा व्यक्त करणारी आहे. भाऊरावांनी आपल्या अनेक वसतिगृह,शाळा व महाविद्यालयांना ऐतिहासिक,सामाजिक,सांस्कृतिक क्षेत्रात मौलिक विचार व कार्य केलेल्या व्यक्तिंची महापुरूषांची नावे दिली. त्या नावांचा आदर्श विद्यार्थ्यांनी घ्यावा म्हणून जणू ही सामाजिक बांधिलकिची प्रतिकेच त्यांनी उभी केली होती त्यातून विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक बांधिलकिचे तत्व स्थापित होणार होते.

सारांशता, अशा अनेक प्रसंगातून भाऊरावांची शिक्षण कार्यातील तत्वनिष्ठा स्पष्ठ होते. जातीभेदातीत स्वावलंबणाच्या श्रमाधिष्ठित शिक्षणाच्या माध्यमातून भाऊरावांनी केलेले बहूजन समाजाकरीता कार्य हे राष्ट्रउभारणीच्या कामातील महत्वाचे अंग आहे. शहरांच्या ठिकाणी शिक्षण संस्था शिक्षण देण्याचे काम करीत होत्या. परंतू भाऊरावांनी गाव तिथे शाळा,शाळा तिथे वसतिगृह हे भाऊरावांच्या कार्याचे सुत्र होते. यासुत्रांने त्यांनी श्रममुल्य,स्वावलंबन,स्वत्व,स्वाभिमान,आत्मविश्वास ही तत्वे शिक्षणाच्या माध्यमातून रूजविण्याचे काम त्यांनी केले. शिक्षणाच्या तत्वनिष्ठेतून ज्ञानगंगेचे पाठ खेडोपाडी झोपडीपर्यंत नेले. ख—या अर्थाने भाऊरावांनी ग्रामिण महाराष्ट्रात शिक्षणाची चळवळ उभारली. म्हणूनच ते ग्रामिण शिक्षणचळवळीचे जनक ठरतात. या चळवळीला भाऊरावांनी आपल्या कर्तृत्व व विचारातून तत्वनिष्ठ बनविले होते. संस्थेसाठी मिळालेल्या एका पैशाचाही वापर त्याने स्वत:साठी वा स्वत:च्या कुटूंबासाठी केला नाही. किंबहूना संस्थेसाठी केलेल्या कामाचा मोबदलाही त्यांनी कधी घेतला नाही. स्वत:चे आयूष्य खर्च करून महाराष्ट्रात आधुनिक विचारांची तत्वनिष्ठ पिढी घडवण्याचे



243

Scanned by CamScanner

Scanned by CamScanner